# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११–२०१०/ दिनांक :

श्री. बबन दत्तू निकम,
मु.पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बबन दत्तू निकम, मु.पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली यांनी आपला अर्ज श्री. शकील बादशहा मुल्ला या प्रतिनिधीमार्फत दि. ११.१.२०१० रोजी मंचात दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये एस.ओ.पी. प्रमाणे नवीन शेतीपंप वीज कनेक्शन मिळावे व विलंबापोटी नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. सदर तक्रारीसाठी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे रितसर अर्ज दाखल केला होता. तथापि, कक्षाने दिलेला र्निय मान्य नसल्याने मंचामध्ये तक्रार दाखल केली आहे.

वि.प.ने दिलेले खर्च करावयाचे चलन ग्राहकाने दि.३.११.२००८ रोजी भरल्याचे दाखल कागदपत्रांवरुन दिसून येते. चलन भरल्यानंतर ग्राहकाने चाचणी अहवाल वि.प.कडे दि. ६.११.२००८ रोजी दाखल केलेला आहे. म्हणून वि.प.ने जागेवर दि. १२.१.२०१० रोजी संयुक्त तपासणी केली, त्यावेळी चाचणी अहवालात नोंद केल्याप्रमाणे जागेवर मोटर अगर इतर आवश्यक साहित्याची मांडणी केली नसल्याचे आढळून आले. सदरची तपासणी ग्राहकाच्या समक्षच करण्यात आल्याचे वि.प.ने कथनात सांगितले. सुनावणीवेळी ग्राहक वा प्रतिनिधी उपस्थित नसल्याने त्याची खातरजमा करता आली नाही. मात्र संयुक्त तपासणी नंतर दिनांक २०.१.२०१० रोजी ग्राहकाने चाचणी अहवाल दाखल केला आहे व त्यामुळे मुदतीत कनेक्शन देण्याचे वि.प.ने मान्य केले आहे. सदर जोडणीसाठी २ पोलचे लघुदाब वाहिनीचे काम करण्याचे आहे. दिनांक २०.१.२०१० नंतर ३ महिन्याचे आंत म्हणजेच १९.४.२०१० पर्यंत वीज जोडणी देण्याचे मान्य केले असल्याने विहित मुदतीत काम करण्याचे मान्य केल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सबब सदरचा अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्जदाराच्या मागणी प्रमाणे वीज जोडणी दि. १९.४.२०१० पर्यंत देण्याचे वि.प.ने मंचासमोर मान्य केले असल्यामुळे अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :